**साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

दि.०२/०९/२०२५

**विषय:- साईआश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा विभागाकडील यांत्रिकिकरणासह हाऊसिकपींग, विद्युत, प्लंबीग, बगिचा, पेस्ट कंट्रोल फॉगिंग, स्वच्छता इ. दुरुस्ती व देखभालीची कामासंदर्भात प्री-बीड मिटींगमध्ये अटी व शर्ती संबंधी झालेल्या सभेचे इतिवृत्त...**

सोमवार दि.०१/०९/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता आदरणीय महोदय श्री गोरक्ष गाडीलकर मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली साईआश्रम भक्तनिवास, साईधर्मशाळा विभागाकडील यांत्रिकिकरणासह हाऊसिकपींग, विद्युत, प्लंबीग, बगिचा, पेस्ट कंट्रोल फॉगिंग, स्वच्छता इ. दुरुस्ती व देखभालीची कामे आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी दोनही विभागाकरीता ई-निविदा भरणेपुर्वी निविदाधारकां समवेत आयोजित करणेत आलेल्या ई- निविदेतील अटी व शर्तीबाबत चर्चा करणेसाठी प्री-बीड सभा आयोजित करणेत आलेली होती.

**सभेससाठी खालीलप्रमाणे अधिकारी उपस्थित होते.**

| | |
|---|---|
| ०१) श्री. गोरक्ष गाडीलकर | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| ०२) श्री. भिमराज दराडे | उपमुख्य कार्यकारी अधिकारी |
| ०३) श्री. संदिपकुमार भोसले | प्रशासकिय अधिकारी |
| ०४) श्री. अविनाश कुलकर्णी | प्र. मुख्य लेखाधिकारी |
| ०५) श्री.विजय वाणी | प्र. अधिक्षक साईआश्रम भक्तनिवास |
| ०६) श्री.सुनिल शिंदे | प्र. अधिक्षक, साईधर्मशाळा |
| ०७) श्री. शरद डोखे | प्र.अधिक्षक, कामगार विभाग |
| ०८) श्री. गोरक्षनाथ नलगे | प्र.अधिक्षक, विधी विभाग |

**तसेच खालील नमुदप्रमाणे हाऊसकिपींग निविदाधारक उपस्थित होते.**

०१) बि.व्हि.जी. इंडीया, पुणे
०२) नॅशनल सेक्युरीटी सर्व्हिसेस, पुणे
०३) इन्फंट्री सिक्युरिटी ॲण्ड फॅसिलीटी, मुंबई
०४) शुभम सर्व्हिसेस, पुणे
०५) फोकस फॅसिलीटी, पुणे
०६) विअलायंन्स फॅसिलीटी मॅनेजमेंट, मुंबई
०७) मॉडर्न फॉसिलीटी, पुणे

सभेचे सुरवातीस उपस्थित निविदाधारकांना सुचना करुन निविदा संदर्भात काही अडचणी असल्यास मांडणेबाबत सुचना दिल्या त्याबाबत उपस्थित निविदाधारकांपैकी काही प्रतिनिधींनी त्यांच्या अडचणी / शंका / मुद्दे ई – मेलव्दारे उपस्थित केले त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं | उपस्थित अडचणी / शंका / मुद्दे | खुलासा |
|---|---|---|
| ०१ | आपणास अशी विनंती आहे की आपण जर दि.१२-१३ तारखेला पेमेंट केले व इतर बाबींचे चेकिंग ऑडीट नंतर केले तरी कॉन्ट्रॅक्टर उशिरा सरकारी पेमेंट केल्यामुळे जो भुरदंड सोसावा लागतो तो लागणार नाही. | १) साईआश्रम भक्तनिवास ई-निविदा पान क्र.११ मुद्दा क्र. J-2 नुसार सर्व कागदपत्रांची पुर्तता दि.०३ तारेखेपर्यंत केल्यानंतर आपले देयेके संस्थानचे विहीत पध्दतीने देण्यात येईल.<br>२) साईधर्मशाळा ई-निविदा पान क्र.११ मुद्दा क्र. K-2 नुसार सर्व कागदपत्रांची पुर्तता दि.०३ तारेखेपर्यंत केल्यानंतर आपले देयेके संस्थानचे विहीत पध्दतीने देण्यात येईल. |
| ०२ | लेबर लायसन्स मिळविणेकामी प्रथमतः फॉर्म ५ प्राप्त झाल्यानंतर लेबर लायसन्स अदा करण्याऱ्या अधिकाऱ्यांच्या उपलब्धता व तांत्रिक अडचणी लक्षात घेऊन कालावधी वाढवून देण्यात यावा | साईआश्रम भक्तनिवास विभागाकडील ई-निविदा पान क्र.०९ मुद्दा क्र. H-५ व साईधर्मशाळा विभागाकडील ई-निविदा पान क्र.०९ मुद्दा क्र. H-५ प्रमाणे राहील. |

**पानं नं. २ वर...**

| अ.नं | उपस्थित अडचणी / शंका / मुद्दे | खुलासा |
|---|---|---|
| ०३ | मा. महोदय साहेब यांनाआवर्जुन मत मांडु इच्छित आहे की, नवीन कंत्राटदार BOQ मध्ये दर टाकताना आपण निर्देशित केलेल्या अटी शर्तीन्वये संपुर्णतः नवीन मशिनरी खरेदी अथवा पुरविणेच्या दृष्टीकोनातुन विचार करुन त्याप्रमाणे दर नमुद करतील.<br>परंतु सध्या कार्यरत असणारे एजन्सी टेंडर प्रक्रीयेमध्ये सहभागी होत असताना यांचेकडे मुळतः जुन्या मशिनरी उपलब्ध राहतील. त्यानुसार सदरील कार्यरत कंत्राटदार जुन्या मशिनरी वापरणेचे गृहीत धरुन दर टाकण्यात आले तर इतर स्पर्धकांना जुन्या मशिनरी वापरण्याची परवानगी मिळेल का ? किंवा जुन्या मशिनरी भाडेतत्वावर आणुन वापरले तर ते मान्य राहील का ? | साईआश्रम भक्तनिवास विभागाकडील ई-निविदा पान क्र.०८ मुद्दा क्र. H-३ प्रमाणे राहील. तसेच साईधर्मशाळा विभागाकडील ई-निविदा पान क्र.०८ मुद्दा क्र. H-३ प्रमाणे राहील. |
| ०४ | जर विभागातील काही इमारती ह्या आजच्या तारखेला बंद असतील आणि पुढीचे काही महिने बंद राहणार असतील तर ई निविदेमध्ये नमुद करणेत आलेल्या मशिनरी संख्या ह्या विभागातील पुर्ण इमारतीनुसार खरेदी करावयाच्या किंवा ज्या इमारती चालु असतील त्याप्रमाणे खरेदी करावयाच्या याबाबत स्पष्टता करण्यात यावी | साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा विभागाकडील ई-निविदेमध्ये नमुद केलेले सर्व मशिनरी घ्यावयाचे आहे. |
| ०५ | आपल्या ई निविदेमधील अट क्र. 12 (अ) मध्ये नमुद असल्याप्रमाणे घरभाडे भत्ता, पगारी आठवडा सुट्या, पगारी सुट्या उपदान (ग्रॅच्युइटी) हे सर्व आर्थिक देणी देणेबाबतीत कंत्राटदाराची जबाबदारी राहील. असे नमुद असुन निविदेमधील अट क्र. 12 (क) मध्ये झोन नं.2 प्रमाणे अनुज्ञेय असणारी किमान वेतनदर अधिक प्रा. फंड प्रशासकिय चार्जेस सर (मालकाचा हिस्सा 13.00%) कर्मचाऱ्याच्या वेतनाच्या रक्कमेवर सर्व्हिस चार्जेस रक्कम अधिक ई.एस.आय.सी (मालकाचा हिस्सा 3.25%) सह संपुर्ण बीलाच्या रक्कमेवर अनुज्ञेय जी.एस.टी अधिक सानुग्रह अनुदान 8.33% (प्रत्येक वर्षी दिपावळी सणाचे वेळी) याप्रमाणे रक्कम संबंधीत ठेकेदारास संस्थानकडुन देणेत येईल. असे स्पष्ट पणे सुचविणेत आलेले आहेत.<br>त्यानुसार किमान वेतन कायद्याचे पालन करतेवेळी वरील प्रमाणे सर्व आर्थिक देणी संस्थान कडुन देणेबाबत विचार करणेत यावा. | साईधर्मशाळा ई-निविदा पान क्र.०७ मुद्दा क्र. F-१२-अ निविदाधारकाची निविदा मंजूर झालेनंतर त्यांनी सदर कामासाठी घेतलेल्या कामगारांचे कामगार कल्याण निधी, ग्रुप इन्सुरन्स प्रिमियम, वर्क मेन कॉम्पेनसेशन पॉलीसी, व्यवसाय कर, आयकर, टी.डी.एस, इन्क्रीमेंट, पगारी सुट्या संस्थान नियमाप्रमाणे मंजुर, उपदान (ग्रॅच्युइटी), जी.एस.टी, कामगार कायद्यानुसार वेतन स्लिप व इतर आर्थिक देणी देणेबाबतची संपुर्ण कायदेशीर जबाबदारी निविदाधारकावर बंधनकारक राहील. संस्थान त्यासाठी कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही अथवा त्याची तोषीस व झळ संस्थानला लागणार नाही हे निविदाधारकावर बंधनकारक राहील. उपरोक्त प्रमाणे राहील. |
| ०६ | स्वछता ह्या शब्दाच्या व्याख्येमध्ये घनकचरा व्यवस्थापन, हॉस्पिटल स्वछता, हॉटेल स्वछता, रस्ता व नालेसफाई स्वछता इत्यादी ग्राह्य धरले जातील कि फक्त निवासस्थान / देवस्थान धरले जातील | स्वच्छता शब्दाच्या व्याख्येमध्ये साईआश्रम व साईधर्मशाळा विभागाकडे निघणारे सर्व कामे स्वच्छताबाबत ग्राह्य धरले जातील. |

उपरोक्त प्रमाणे झालेल्या प्री-बीड मिटींगमध्ये निविदाधारकांनी उपस्थित केलेले मुद्दे, ई-मेलव्दारे उपस्थित केलेले मुद्दे व त्यावरील खुलासा निविदाधारकांचे माहितीसाठी संस्थानचे संकेतस्थळावर माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत व महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर आय.टी. विभागामार्फत प्रसिध्द करणेस मान्यता असावी.

(विजय वाणी)
प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास

(सुनिल शिंदे)
प्र.अधिक्षक, साईधर्मशाळा

(संदिपकुमार भोसले)
प्रशासकिय अधिकारी,

(भिमराज दराडे)
उपमुख्य कार्यकारी अधिकारी,

(गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**